MHST200025672020

## वि.दि.दा.क्र.४४२/२०२३ मधील निशाणी क्र.११० वरील आदेश

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दाव्याचे सरनाम्यात दुरुस्ती करणेसाठी दाखल केला आहे.

२. वादी यांनी असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्रं.१ रामचंद्र कृष्णा कुंडलकर हे दि.०३/०४/२०१६ रोजी व प्रतिवादी क्र.३ब जितेंद्रकुमार जनार्दन कुंडलकर हे दि.१६.०६.२०२३ रोजी मयत झालेले आहेत. सदर प्रतिवादी क्रं.३ब हे अविवाहीत व निपुत्रीक होते. प्रतिवादी क्रं.१ यांचे वारस प्रतिवादी क्रं.२ ते ८ व प्रतिवादी क्रं.३ब यांचे वारस प्रतिवादी क्रं.३अ, ३क, ३ड व ३इ हे पुर्वीपासुन दाव्यात सामील असलेने वेगळे वारस दाव्यात सामील करण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे वादी यांनी सदर प्रतिवादी यांचे नावाचे पुढे 'मयत' असे लिहुन दावा नि.१ मध्ये तशी दुरूस्ती करुन मिळणेची विनंती केलेली आहे. सदर दुरूस्तीमुळे दाव्याचे स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. तरी, दाव्याचे सरनाम्यात प्रतिवादी क्रं.१ व ३ब यांचे नावापुढे 'मयत' अशी दुरूस्ती करण्यास परवानगी मिळावी. त्यामुळे त्यांनी अशी विनंती केली आहे की, सदरचा अर्ज मंजुर करण्यात यावा.

३. प्रतिवादी क्रं.१ ते ३ यांनी सदर अर्जावर म्हणणे देवुन अर्जातील संपुर्ण मजकुर नाकारला. त्यांनी असे कथन केले की, सदर प्रतिवादी क्रं.१ हे सन २०१६ साली मयत झाले असुन वादी यांनी त्याबाबत आवश्यक ती तजवीज कायदयाप्रमाणे मुदतीत केलेली नाही. त्यामुळे, वादींनी त्याबाबत हलगर्जीपणा व निष्काळजीपणा केला असल्याने त्यांचेवर रक्कम रुपये २,०००/- दंड आकारण्यात यावा. सबब, त्यांनी अशी विनंती केली की, सदरचा अर्ज नामंजुर करणेत यावा.

४. वादी यांनी प्रस्तुतचा दावा वाटप, निरंतर ताकीद व जाहीर ठराव होऊन मिळण्याकरीता दाखल केला आहे. सदरची दुरुस्ती ही तांत्रिक स्वरुपाची आहे. अशी दुरुस्ती केल्यास दाव्याचे मुळ स्वरुपामध्ये कोणताही बदल होणार नाही. सदर दुरुस्तीस परवानगी दिल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होईल असे मला वाटत नाही. परंतु, सदर दुरूस्ती अर्ज वादी यांनी विलंबाने दाखल केलेला असल्याने त्यांचेविरुद्ध खर्चाच्या रकमेचा आदेश करणे क्रमप्राप्त आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे :

**<u>आदेश</u>**

१) अर्ज (नि.११०) खर्चासह मंजुर करण्यात येतो.

२) वादी यांनी खर्चाची रक्कम रुपये ५००/- (पाचशे रुपये फक्त) सरकार जमा करावी.

३) वरील खर्चाची पुर्तता केलेनंतर वादी यांनी अर्जात नमुद केलेप्रमाणे १४ दिवसांचे आत दुरुस्ती करुन दावा दुरुस्त प्रत अभिलेखावर दाखल करावी.

ANKUSH ATMARAM PACHARNE
Digitally signed by ANKUSH ATMARAM PACHARNE
Date: 2025.11.14 16:41:09 +0530

स्थळ : वाई. ( ए.ए.पाचरणे )
दिनांक : ११.११.२०२५ सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, वाई.